श्री तुळजा भवानी मंदीर संस्थान संचलीत

# श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालय,

## तुळजापूर 413601 जि. उस्मानाबाद

Ph No. 02471 243603. Email- stbcet@gmail.com Web – www.stbcet.org.in

जा.क्र./श्री तुभअम/भांडार/2019/ दिनांक – 07/03/2019

प्रती,

____________________________

____________________________

विषय – श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातील मुलांचे व मुलीचे वस्तीगृहातील लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार विक्रीसाठी सिलबंद दरपत्रक सादर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी श्री तुळजा भवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातील मुलांचे व मुलीचे वस्तीगृहातील लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार विक्रीस काढण्यात येत आहे. तरी खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सिलबंद दरपत्रक सादर करावे.

विहीत दरपत्रकाचा नमुना महाविद्यालयाच्या सुचना फलकावर व तसेच महाविद्यालयाच्या वेब साईट वर www.stbcet.org.in <u>दिनांक.– 07/03/2019 ते दिनांक. 18/03/2019 पर्यंत प्रसिध्द करण्यात येत आहे.</u> **<u>दरपत्रक स्वीकारणे अंतीम दिनांक – 18/03/2019 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत यानंतर आलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.</u>** प्राप्त दरपत्रके दिनांक 19/03/2019 रोजी मा. प्राचार्य यांच्या कक्षात दुपारी 03.00 वाजता उघडण्यात येतील.

### दरपत्रकाच्या अटी व शर्ती

1. दरपत्रकासोबत खालील कागदपत्राच्या झेरॉक्स / छायांकीत सत्य प्रती जोडणे आवश्यक आहे.

   अ) शॉप ॲक्ट लायसन्स (भंगार साहित्य खरेदी व विक्री लायसन्स) व सदर दाखला (लायसन्स) नुतनीकरण केलेला असणे आवश्यक आहे.

   ब) पॅन कार्ड, आधार कार्ड छायांकीत सत्य प्रती

   क) दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र सही व शिक्क्यासह स्वतःच्या लेटरहेड वर

2. दरपत्रक धारकानी महाविद्यालयातील मुलांचे व मुलीचे वस्तीगृहातील लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार साहित्याचा साठा व दर्जा समक्ष पाहुनच दरपत्रकामध्ये दर भरावेत. तसेच भरलेले दर हे बाजारभावापेक्षा कमी असु नयेत.
3. भंगार साहित्याचे वजन करण्यासाठी वजन काटा, मनुष्यबळ व इतर आवश्यक बाबी दरपत्रकधारकाकडे असणे आवश्यक आहे. सदर किरकोळ भंगार साहित्याचे वजन दरपत्रक धारकाच्या, भंगार विक्री समितीच्या समोर करण्यात येईल.
4. महाविद्यालयातील मुलांचे व मुलीचे वस्तीगृहातील लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार साहित्याची वाहतुक स्वखर्चाने करावी लागेल.

...2...

Scanned by CamScanner

5. महाविद्यालयातील मुलांचे व मुलींचे वस्तीगृहातील लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार साहित्याचे वजन झाल्यावर त्याच दिवशी साहित्याचे स्थलांतर करण्यापुर्वी सदरील साहित्याची देय रक्कम रोखीने महाविद्यालयास अदा करावी लागेल.

6. **महाविद्यालयातील मुलांचे व मुलींचे वस्तीगृहातील लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार साहित्याचे दर महाविद्यालयाद्वारे देण्यात आलेल्या दरपत्रकावरच भरावेत स्वतःच्या लेटरहेडवर किंवा को–या कागदावर दर भरु नयेत असे दर भरले गेल्यास ते ग्राहय धरले जाणार नाहीत.**

7. लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार साहित्याचे दर लिहीताना कोणत्याही प्रकारची खाडाखोड / ओव्हररायटींग अथवा व्हाईटनरचा वापर करु नये. जर खाडाखोड झाली असेल तर दरपत्रकधारकाने बाजुला दर लिहुन स्वाक्षरी करावी.

8. दरपत्रकधारकाने स्वतःच्या अटी घालुन दरपत्रक भरल्यास असे कोणतेच दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही.

9. लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार साहित्यामधील एखाद्या वस्तुस योग्य किंमत न आल्यास भंगार वस्तु विकणे अथवा न विकणे / स्थगीत ठेवणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीताकडे राखुन ठेवणेत आला आहे.

10. या दरपत्रका संदर्भात कांही वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण केवळ तुळजापूर येथील तालुका कोर्टातच चालविले जाईल.

11. जर दोन दरपत्रक धारकाचे दर लोखंड, पत्रा व इतर किरकोळ भंगार साहित्याबाबत समान असल्यास मा. प्राचार्य व समिती समोर चर्चा / बोली करुन जास्तीत जास्त किमंत देणा–या दरपत्रक धारकास सदर साहित्याची विक्री केली जाईल.

12. वरिल दरपत्रक अटी व शर्तीमध्ये बदल करणे, दुरुस्ती करणे, एक किंवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारणे /स्थगीत ठेवणे अथवा रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांकडे राखुन ठेवला आहे.

| अ. क्र. | भंगार साहित्याचे नाव व तपशील | अंदाजे वजन | किंमत अंकात एकुण | दर प्रती किलो अक्षरी |
|---|---|---|---|---|
| 1 | लोखंड | 1000 Kg | ............. रु. | |
| 2 | पत्रा | 1000 Kg | ............. रु. | |
| 3 | व इतर किरकोळ भंगार | 500 Kg | ............. रु. | |

प्राचार्य
श्री. तु.भ.अभि.महाविद्यालय,
तुळजापूर

Scanned by CamScanner